


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : २५८ वा | गुरूवार- दि २५ डिसेंबर २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# मुंबईचा महापौर मराठीच होणार,आमचाच होणार!...

## उद्धव ठाकरे व राज ठाकरे बंधू एकत्र युतीची केली मोठी घोषणा

वृत्तसंस्था/मुंबई

मुंबई महापालिका निवडणुकांसाठी ठाकरे बंधूंनी अखेर एकत्र येण्याचा निर्णय जाहीर केला आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्यात बीएमसी निवडणूक साठी युतीची घोषणा करण्यात आली. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी मुंबईतील वरळी येथील ब्लू सी हॉटेलमध्ये पत्रकार परिषद घेत युतीची औपचारिक घोषणा केली. यावेळी उद्धव आणि राज यांच्यासह संजय राऊतही व्यासपीठावर होते. तिघांनीही उपस्थितांशी संवाद साधला. मुंबईचा महापौर मराठीच होणार आणि आमचाच होणार, असं राज ठाकरेंनी ठणकावून सांगितलं. जाहीर सभा सुरु झाल्या की बाकी बोलायचं ते बोलू. पण माझी एक मुलाखत झाली होती, त्याची मुद्दाम आठवणूक करुन देऊ इच्छितो की, त्यात मी म्हटलं होतं की कुठल्याही भांडण किंवा वादापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे. त्या वाक्यापासून आम्ही एकत्र येण्याची सुरुवात झाली. असं राज ठाकरे म्हणाले. कोण किती जागा लढवणार, आकडा काय, हे नाही सांगणार. महाराष्ट्रात लहान मुलं पळवणाऱ्या टोळ्या आहेत. त्यात दोन टोळ्या जास्त झाल्यात, ते राजकीय पक्षातील मुलं पळवतात. ज्याची अनेक दिवस वाट पाहिली जात होती, शिवसेना आणि मनसेची युती झाली हे आम्ही जाहीर करत आहोत. अशी घोषणा राज ठाकरे यांनी केली. उद्धव ठाकरे यांची ही शेवटची निवडणूक असेल, असं रावसाहेब दानवे म्हणाले होते त्यावरुन पत्रकारांनी प्रश्न विचारला असता, संजय राऊत म्हणाले की ते स्वतः निवडणुकीत पराभूत झाले. तर उद्धव ठाकरे म्हणाले, की आपण त्यांच्यावर बोलावं इतकीही त्यांची पातळी उरली नाही. तर राज ठाकरे यांनी देवांच्या प्रश्नांना उत्तर द्यावीत, दानवांच्या प्रश्नांना नाही अशी कोटी करत हशा पिकवला. मुंबईचा महापौर मराठीच होणार आणि तो आमचाच



होणार, असंही राज ठाकरे यांनी ठणकावून सांगितलं. मुख्यमंत्री अल्ला हाफिज बोलतानाचा एक व्हिडिओ फिरतोय. माझ्याकडे खूप व्हिडिओ आहेत, असा इशारा राज ठाकरे यांनी दिला.

---

# राज्यात ठाकरे बंधू एकत्र, पण छत्रपती संभाजीनगरमध्ये मनसेला मोठं भगदाड



वृत्तसंस्था/ छत्रपती संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगर : राज्यात बुधवारी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना एकत्र येण्याची जोरदार घोषणा होत असतानाच, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात मात्र शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षापाठोपाठ मनसेलाही मोठे भगदाड पडले आहे. मनसेचे जिल्हाध्यक्ष सुमित खांबेकर यांनी शिवसेनेत प्रवेश केला. तर शहराध्यक्षांसह तब्बल ३० ते ४० पदाधिकाऱ्यांनी भाजपची वाट धरली आहे. राज्यात उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येत असल्याच्या वृत्तांनी बुधवारी इलेक्ट्रॉनिक माध्यम व्यापून टाकले आणि ठाकरे बंधुंच्या युतीबद्दल राज्यभर जल्लोश सुरू झाला. अर्थातच, दोन्ही ठाकरे एकत्र येत असल्याचे काय आणि कसे परिणाम होणार, याविषयीच्या चर्चांनाही ऊत आला. अशा सगळ्या उत्सवी वातावरणात विरजण पडले ते छत्रपती संभाजीनगरात. मनसेचे जिल्हाध्यक्ष सुमित खांबेकर यांनी ठाकरे बंधू एकत्र येत असतानाच मुंबईतून हळूच शिवसेनेत प्रवेश केला आणि शिवसेनेचे मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री संजय शिरसाट यांच्यासोबतचा फोटो थेट समाज माध्यमांमध्ये स्वत:च पोस्ट केला. सायंकाळी सुमारे पाच वाजता ही पोस्ट त्यांनी स्वत: व्हायरल केली आणि मला छत्रपती संभाजीनगरसाठी काम करायचं आहे. माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या जनतेसाठी आणि कार्यकर्त्यांसाठी मी कायम सेवेत राहील... बाकी लवकरच बोलतो अशा शब्दांत त्यांनी आभारही मानले. या अनुषंगाने त्यांच्याशी संवाद साधला असता, त्यांनी आपण शिवसेनेत प्रवेश केल्याचे मटा ऑनलाईनशी बोलताना स्पष्ट केले. जिल्हाध्यक्ष खांबेकर यांच्याबरोबरच शहराध्यक्ष गजन गौडा पाटील, आशिष सुरडकर यांच्यासह ३० ते ४० पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी बुधवारी सकाळी भाजपमध्ये मुंबईतून प्रवेश केला. विशेष म्हणजे मनसेचे पदाधिकारी आठ दिवसांपासून मुंबईत तळ ठोकून होते आणि भाजपच्या संपर्कात होते. एकूणच राजकीय स्थिती-परिस्थितीतून सर्वांनी भाजपमध्ये प्रवेश घेण्याचा निर्णय घेतला

# ...संचालकांबाबतची संदिग्धता...



बँकिंग नियमन कायद्यात सुधारणा करीत नागरी सहकारी बँकांच्या संचालकांचा कालावधी सलग १० वर्षे करण्यात आल्यानंतर केंद्र सरकारने २९ जुलै रोजी एका परिपत्रकाद्वारे संबंधित सुधारणा दिनांक १ ऑगस्ट २०२५पासून अंमलात येणार असल्याचे जाहीर केले. या परिपत्रकाने या संदर्भातील संभ्रम अधिकच वाढवला आहे. कारण १० वर्षांचा कालावधी कधीपासून मोजायचा याबाबत स्पष्टता नाही. कायद्यातील हा बदल एक ऑगस्ट २०२५पासून लागू झाला आहे. याचाच अर्थ या दिवशी एखाद्या विशिष्ट संचालकास संचालकपदी राहून सलग १० वर्षे पूर्ण झाली असतील तर एक ऑगस्ट २०२५नंतर होणाऱ्या निवडणुकीसाठी तो अपात्र ठरण्याची शक्यता आहे. कायद्याच्या तरतुदीत सलग १० वर्षे म्हणजेच कोणताही खंड न घेता १० वर्षांचा कालावधी, असा उल्लेख आहे. जर एखाद्या व्यक्तीने नऊ वर्षे झाल्यानंतर राजीनामा दिला, तर तो पुन्हा निवडणुकीसाठी पात्र ठरेल. असे झाल्यास कायद्यामधील या सुधारणेचा हेतूच विफल होईल. एखादी व्यक्ती सलग १० वर्षे संचालक राहिल्यानंतर पाच वर्षांच्या खंडानंतर पुन्हा निवडणुकीसाठी पात्र ठरेल का, या प्रश्नाचे उत्तरही नकारार्थीच द्यावे लागेल. कारण सलग १० वर्षे संचालकपदी राहिलेली व्यक्ती त्यानंतर संचालक होण्यास कधीच पात्र ठरणार नाही, असे कायदा सांगतो. याचा अर्थ एखादा संचालक सलग १० वर्षे संचालक राहिल्यास तो नंतर कायमस्वरूपी अपात्र ठरण्याची शक्यता आहे. बँकिंग नियमन कायद्यातील ही तरतूद बँकेच्या अध्यक्षांना व पूर्ण वेळ संचालकांना लागू केलेली नाही. १० वर्षांचा कालावधी मोजताना त्यांच्या अध्यक्षपदाचा कार्यकाळ मोजायचा नाही का? अथवा अध्यक्ष असलेल्या व्यक्तीस ही तरतूद लागू होणार की नाही? ङ्गपूर्ण वेळ संचालकफ ही संकल्पना व्यापारी बँकिंग क्षेत्रातील आहे. तेथे अध्यक्ष अथवा पूर्ण वेळ संचालक हे पगारी असतात. सबब व्यापारी बँकांसाठी करण्यात आलेली ही तरतूद नागरी सहकारी बँकांना लागू करताना त्यामध्ये सहकारी बँकांच्या कार्यपद्धतीनुसार बदल करणे अपेक्षित होते. महाराष्ट्र सरकारने सन १९६९मध्ये राज्याच्या सहकार कायद्यात सुधारणा करून कोणत्याही संचालकास सलग सहा वर्षांपेक्षा अधिक काळ अध्यक्ष अथवा उपाध्यक्ष पदावर राहता येणार नाही, अशी तरतूद केली. सन १९८३मध्ये त्यात सुधारणा करून सहा वर्षांचा कालावधी १० वर्षांपर्यंत वाढविण्यात आला. परंतु ङ्गसलगफ या शब्दावर कायदेशीर कीस पाडत अनेक जण १० वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच पाच-सहा महिने अगोदर राजीनामा देऊन पुन्हा निवडून, पुन्हा पुढील १० वर्षांची पात्रता धारण करण्याची शक्यता होती. अथवा तशी उदाहरणे घडल्याने राज्य सरकारने १९८६मध्ये सहकार कायद्यात सुधारणा करीत सलग शब्दाऐवजी एकूण असा बदल केला. त्यामुळे तुकड्या-तुकड्यांचा कालावधी देखील मोजण्यात येऊ लागला. कायद्यातील पळवाट बंद झाल्याने अनेकांची निराशा झाली आणि सगळ्यांनी एकत्र येऊन २००७मध्ये सहकार कायद्यातून ही १० वर्षांची तरतूदच वगळली! केंद्र सरकारने संबंधित कायद्यात दुरुस्ती करताना महाराष्ट्र सरकारच्या सहकार खात्याचा अनुभव विचारात घेणे आवश्यक होते, असे गमतीने म्हणावेसे वाटते. कारण सहकारी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसाठी १९६९मध्ये दहा वर्षांच्या कार्यकाळाबाबत कलम ७३-अ मध्ये दुरुस्ती करताना सहकार खात्याने अनेक शक्यतांचा विचार करून, कायदा वाचताना कोठेही शंकेला वाव मिळणार नाही, याची खबरदारी घेतली होती. १) कलम ७३-अ नंतर खाली दिलेल्या खुलाशात १० वर्षांची मुदत मोजताना सदर कायदा अस्तित्वात येण्यापूर्वीचा कालावधी विचारात घ्यावयाचा नाही, असे स्पष्ट नमूद केले होते. २) कायद्यातील पळवाट शोधून सरकारच्या हेतूला हरताळ फासला जाऊ नये, म्हणून याच कलम ७३-अ च्या खाली खुलासा क्र.२ मध्ये असे नमूद केले होते की, १० वर्षांचा कालावधी संपण्यापूर्वी मागील १२ महिन्यांत पदाधिकाऱ्याने राजीनामा दिल्यास, त्याने १० वर्षांचा कालावधी पूर्ण केला, असे मानण्यात येईल. ३) याच कलमानंतर खुलाशामध्ये असेही स्पष्ट करण्यात आले होते, की अशा व्यक्तीस १० वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर, त्या समितीचा एक कालावधी (सध्या पाच वर्षे) संपेपर्यंत पुन्हा निवडणुकीस उभे राहता येणार नाही. म्हणजे पाच वर्षांच्या खंडानंतर ती व्यक्ती पुन्हा पुढील दहा वर्षांच्या कालावधीसाठी संचालक होऊ शकत होती. बँकिंग नियमन कायद्यामधील नवीन तरतुदींनुसार मात्र संबंधित व्यक्तीने संचालक म्हणून सलग १० वर्षांचा कालावधी एकदा जरी पूर्ण केला तरी त्यास त्या संस्थेवर आयुष्यभरात पुन्हा कधीही संचालक होता येणार नाही. बँकिंग नियमन कायद्यातील नवीन दुरुस्ती वाचताना, त्यामध्ये ङ्गसलग १० वर्षेफ हा उल्लेख केल्याने एक ऑगस्ट २०२५ नंतर होणाऱ्या निवडणुकींद्वारे प्रथम निवडून येणारे संचालक १० वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच राजीनामा देतील व थोड्या कालावधीनंतर निवडणुकीद्वारे पुनश्च निवडून येतील व तहहयात संचालक राहू शकतील. परंतु संबंधित कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी, सलग दहा वर्षांचा कालावधी पूर्ण करणाऱ्या संचालकांना एक ऑगस्ट २०२५ नंतर नवीन तरतुदींनुसार त्या संस्थेचे कधीच पदाधिकारी होता येणार नाही. राज्यस्तरीय नागरी सहकारी संस्थांच्या निवडणुकांवर त्या त्या राज्यांत स्थापन झालेल्या निवडणूक प्राधिकरण ांचे नियंत्रण असते. या पार्श्वभूमीवर, रिझर्व्ह बँकेच्या कायद्यातील तरतुदींच्या आधारे स्वत:च्या कायद्यात बदल न करता, निवडणूक प्राधिकरण एखाद्या उमेदवारास अपात्र ठरविण्याचे धाडस करेल? कारण २०२१ नंतर झालेल्या निवडणुकांसाठी बँकिंग नियमन कायद्यात त्या वेळी आठ वर्षांची तरतूद असतानाही राज्य निवडणूक प्राधिकरणाने एकाही उमेदवारास अपात्र ठरविलेले नाही. नागरी सहकारी बँकांच्या निवडणुकीसाठी राज्याच्या सहकार कायद्यात त्या-त्या राज्य सरकारांनी बदल करणे आवश्यक आहे, की बँकिंग नियमन कायद्यातील संबंधित तरतुदीचे पालन करणे सहकार आयुक्तांना बंधनकारक राहील, या संदर्भात स्पष्टता येणे आवश्यक आहे. जर एखाद्या राज्याने संचालकांच्या कालावधीची कायद्यातील तरतूद विचारात न घेता नागरी सहकारी बँकांच्या निवडणुका घेतल्या तर रिझर्व्ह बँक काय करील? ९७व्या घटना दुरुस्तीत सहकारी संस्थांच्या संचालक मंडळाचा कालावधी पाच वर्षे नमूद केला आहे. सन २०२०मधील दुरुस्तीनुसार संचालकांचा सलग कालावधी आठ वर्षे करण्यात आला होता.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# देवेंद्र फडणवीसांचा हट्ट, मोहिते पाटलांना हलक्यात घेतलं; सोलापुरात भाजपला ३ धक्के!

**सोलापूर :** अचूक रणनीती आणि परफेक्ट नियोजनातून राजकीय विरोधकांचा करेक्ट कार्यक्रम करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ओळखले जातात. इतर राजकीय पक्षांतून वजनदार स्थानिक नेते आपल्याकडे घेत फडणवीसांनी काँग्रेस-राष्ट्रवादीच्या अनेक बालेकिल्ल्यांना सुरुंग लावला. परंतु याच फडणवीसांच्या एका निर्णयामुळे तब्बल तीन निवडणुकांमध्ये भाजपचाच गेम झाला. काय होता फडणवीसांचा तो निर्णय ज्यामुळे भाजपला धक्क्यांची हॅट्रिक सहन करावी लागली, ते आपण जाणून घेणार आहोत.मोहिते पाटील...सोलापूर जिल्ह्यासह राज्यातल्या राजकारणातलं एक मातब्बर घराणं. सुरुवातीला शंकरराव मोहिते पाटील, नंतर विजयसिंह मोहिते पाटील आणि आता रणजीतसिंह मोहिते पाटील यांच्यासह धैर्यशील मोहिते पाटील हे या घराण्याचा राजकीय वारसा पुढे नेत आहेत. विजयसिंह मोहिते पाटील हे राष्ट्रवादीचे संस्थापक शरद पवार यांचे निष्ठावंत. पवारांच्या आशीर्वादाने



त्यांनी राज्याचं उपमुख्यमंत्रिपदही भूषवलं. मात्र मोहिते पाटलांच्या ताब्यात असलेल्या सहकारी संस्था आर्थिक अडचणीत आल्या आणि २०१९ च्या निवडणुकीपूर्वी त्यांनी भाजपची वाट धरली. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने मोहिते पाटलांचा बालेकिल्ला असलेल्या माढा लोकसभा मतदारसंघात रणजीतसिंह नाईक निंबाळकरांना उमेदवारी दिली. आमच्या माळशिरस तालुक्यातून भाजपच्या उमेदवाराला १ लाखांहून अधिक लीड देणार, असा शब्द मोहिते पाटलांनी फडणवीसांना दिला आणि तो खराही करून दाखवला. मोहिते पाटलांनी माळशिरसमधून दिलेल्या लीडच्या बळावरच २०१९ मध्ये राष्ट्रवादीच्या बालेकिल्ल्यात भाजपचा खासदार झाला. नंतर मोहिते पाटलांच्या अडचणीत आलेल्या सहकारी संस्था देवेंद्र फडणवीसांच्या मदतीने बहरू लागल्या आणि जिल्ह्याच्या राजकारणात पाटलांनी आपलं बस्तान पुन्हा बसवलं. मात्र खासदार झाल्यानंतर रणजितसिंह नाईक निंबाळकरांचे पुढच्या काळात मोहिते पाटलांशी खटके उडू लागले.आपल्याच बळावर निवडून आलेला खासदार, आपलं ऐकत नसल्याची सल मोहितेंच्या मनात घर करून बसली. त्यातूनच मग २०२४ ची लोकसभा निवडणूक आल्यानंतर मोहिते पाटलांनी निंबाळकरांच्या उमेदवारीला तीव्र विरोध केला. निंबाळकर सोडून कोणालाही उमेदवारी द्या, असं साकडं त्यांनी फडणवीसांना घातलं. पण देवेंद्र फडणवीसही हट्टाला पेटले आणि त्यांनी निंबाळकरांनाच उमेदवारी देण्याचं निश्चित केलं. फडणवीसांच्या या निर्णयाने मोहिते पाटील नाराज झाले आणि त्यांनी पुन्हा माढ्याचं मैदान गाजवण्याची तयारी सुरू केली.विजयसिंह मोहिते पाटलांचे पुतणे धैर्यशील मोहिते पाटील यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीची तुतारी हाती घेत माढा लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. फडणवीसांच्या निर्णयाने दुखावलेल्या मोहिते पाटलांनी लोकसभा निवडणुकीत माढ्यासोबतच आजूबाजूच्या मतदारसंघातही लक्ष घालण्यास सुरुवात केली.

बारामती लोकसभा मतदारसंघात येणारा इंदापूर हा तालुका मोहिते पाटलांपासून जवळच. त्यामुळे मोहिते पाटलांनी बारामतीत पवारांची लेक असलेल्या सुप्रिया सुळेंना इंदापुरात मदत केली. बाजूच्या सोलापूर मतदारसंघातून लढणाऱ्या प्रणिती शिंदेंसाठीही मोहिते पाटील धावून गेले. महायुतीत असलेल्या राजन पाटील यांची त्यांच्या अनगर येथील घरी व्हिलचेअरवर जाऊन विजयसिंह मोहिते पाटलांनी भेट घेतली. सोलापूर लोकसभेत कोणाचं काम करायचं, हे या दोन पाटलांच्या भेटीने मोहोळमधील कार्यकर्त्यांनी समजून घेतलं.

---

# ठाकरे बंधूंचं ठरलं! संजय राऊतांनी उद्याचं लोकेशन सांगितलं; आदित्य ठाकरेंशी खास कनेक्शन..

**मुंबई :** शिवसेना उबाठा आणि मनसे यांच्या युतीचा मुहूर्त अखेर निश्चित झाला आहे. उद्या दोन्ही पक्षांची युती जाहीर होणार असल्याची माहिती शिवसेना उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी दिली आहे. उद्या सकाळी १२ वाजता युतीची घोषणा होणार आहे. संजय राऊत यांनी एक्सवर पोस्ट करुन यासंदर्भातील माहिती दिली आहे. राऊत यांनी उद्धव आणि राज ठाकरे यांचा एक फोटो पोस्ट केला आहे. हा फोटो उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवशी काढण्यात आलेला आहे.मुंबईच्या वरळी येथील हॉटेल ब्लू सीमध्ये उद्या दुपारी १२ वाजता ठाकरे बंधूंकडून युतीची घोषणा होणार आहे. विशेष म्हणजे याच वरळीत उद्धव आणि राज तब्बल दोन दशकांनंतर सार्वजनिकरित्या एका मंचावर आले होते. ५ जुलै २०२५ रोजी वरळीतील एनएससीआय डोममध्ये विजयी मेळाव्यात एकत्र आले होते. त्यावेळी महायुती सरकारनं प्राथमिक शाळेत हिंदी भाषा सक्तीचा जीआर काढला होता. त्या विरोधात दोन्ही भाऊ एकत्र आले. हिंदी सक्तीचा विषय बराच तापला. याचे तीव्र पडसाद उमटले. त्यानंतर सरकारनं जीआर मागे घेतले. तेव्हा ठाकरे बंधूंनी वरळीत विजयी मेळावा घेतला होता. त्याला आता ५ महिने उलटले आहेत.उद्या पुन्हा एकदा वरळीत दोन बंधूंसाठी महत्त्वाचा दिवस असेल. शिवसेना उबाठा आणि मनसे यांच्या युतीची घोषणा केली जाईल. वरळी ठाकरेंच्या शिवसेनेसाठी अनेक अर्थांनी महत्त्वाची आहे. राजकारणात निवडणुकीच्या आखाड्यापासून कायम दूर राहणाऱ्या ठाकरे कुटुंबानं वरळीतूनच निवडणुकीच्या आखाड्यात प्रवेश केला. आदित्य ठाकरे यांनी



२०१९ मध्ये वरळीतून विधानसभा निवडणूक लढवली. २०२४ मध्येही ते याच वरळी मतदारसंघातून विजयी झाले. त्यामुळे ठाकरे कुटुंबासाठी वरळीचं महत्त्व मोठं आहे.विशेष म्हणजे आदित्य ठाकरे निवडणूक रिंगणात उतरणार असल्यानं राज ठाकरेंनी यांनी २०१९ मध्ये मनसेकडून उमेदवार दिला नव्हता. त्याचा लाभ आदित्य यांना झाला. ते मोठ्या मताधिक्क्यानं निवडून आले. आता त्याच वरळीत शिवसेना उबाठा आणि मनसेच्या युतीची घोषणा होणार आहे. मुंबई महापालिकेत एकूण २२७ प्रभाग आहेत. यापैकी १५० ते १६० जागा शिवसेना उबाठा लढू शकते. तर मनसेला ६० ते ७० जागा दिल्या जाऊ शकतात.

---

# प्रभागात केवळ २५६ मतदार, १७८ जणांनी बटन दाबलं 'ट्विस्ट'च 'ट्विस्ट'!

**नागपूर :** नागपूर जिल्ह्यातील कांद्री-कन्हान नगरपंचायतीच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक १ मधून शिवसेनेच्या शिंदे गट उमेदवार मीनाक्षी विशाल भुते यांनी नगरसेविका म्हणून विजय मिळवला आहे. विशेष म्हणजे हा प्रभाग नगरपंचायतीतील सर्वात लहान प्रभाग असून, कमी मतदारसंख्या आणि त्रिकोणी लढत असूनही मीनाक्षी भुते यांनी ठामपणे विजय खेचून आणला आहे. मिळालेल्या ८९ मतांच्या जोरावर त्यांनी प्रतिस्पर्ध्यांवर ३४ मतांची निर्णायक आघाडी घेतली.प्रभाग क्रमांक १ मध्ये एकूण २५६ मतदार नोंदणीकृत होते. यापैकी १७८ मतदारांनी प्रत्यक्ष मतदान केले. मतदानाच्या आकडेवारीनुसार काँग्रेस उमेदवाराला ३४ मते मिळाली, अपक्ष उमेदवाराला ५५ मते मिळाली, तर नोटाला १ मत पडले. अशा परिस्थितीत मतांचे स्पष्ट विभाजन झाले होते. या विभाजनाचा फायदा मीनाक्षी भुते यांना झाला आणि त्यांनी सर्वाधिक ८९ मते मिळवत विजय संपादन केला.

या प्रभागात एकूण तीन उमेदवार रिंगणात होते. शिवसेनेकडून मीनाक्षी भुते, काँग्रेसकडून एक उमेदवार आणि एक अपक्ष उमेदवार अशी थेट लढत होती. कमी मतदारसंख्या असल्यामुळे प्रत्येक मत महत्त्वाचे ठरत होते. स्थानिक पातळीवरील संपर्क, घराघरात पोहोचलेला प्रचार आणि नागरिकांच्या प्रश्नांवर केंद्रित भूमिका यामुळे मीनाक्षी भुते यांना मतदारांचा विश्वास मिळवले.विजयानंतर प्रतिक्रिया देताना मीनाक्षी भुते म्हणाल्या, प्रभाग क्रमांक १ हा सर्वात लहान प्रभाग असला तरी येथील नागरिकांचा विश्वास माझ्यासाठी खूप मोठा आहे. एकूण २५६ मतदारांपैकी मला ८९ मते मिळाली आणि ३४ मतांची आघाडी घेत मी विजयी झाले. या विजयामागे शिवसेनेचे संघटन, कार्यकर्त्यांची मेहनत आणि नागरिकांचा पाठिंबा आहे. कांद्री नगरपंचायतीतील हा निकाल दाखवतो की, केवळ मोठी मतसंख्या किंवा मोठा प्रभाग असणेच विजयाचे मोजमाप नसते, तर स्थानिक प्रश्नांची जाण, विश्वासार्ह नेतृत्व आणि थेट संवाद यामुळेही निवडणूक जिंकता येते. मीनाक्षी भुते यांचा हा विजय 'लहान प्रभागातून मोठा संदेश' देणारा ठरला आहे.

---

# तडीपार झालेल्या गुंडाचा भाजप प्रवेश संपन्न; मयूर शिंदेच्या हाती कमळ..

**ठाणे :** मोक्काअंतर्गत आणि गंभीर गुन्ह्यांप्रकरणी तडीपारीची कारवाई झालेला गुंड मयूर शिंदेनं भाजपमध्ये प्रवेश केला आहे. ठाणे जिल्हाध्यक्ष संदीप लेले, आमदार संजय केळकर, निरंजन डावखरे यांच्या उपस्थितीत शिंदेनं भाजपचा झेंडा खांद्यावर घेतला. ठाणे महापालिका निवडणुकीच्या तोंडावर शिंदेनं कमळ हाती घेतलं आहे. तडीपार गुंडाचा भाजप प्रवेश चर्चेचा विषय ठरला आहे.

गुंड मयूर शिंदे भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचे बॅनर काही दिवसांपूर्वी शहरात लागले होते. शहरातील प्रमुख चौक आणि रस्त्यांवर पक्ष प्रवेशाचे बॅनर झळकले होते. गेल्या सोमवारी गुंड मयूर शिंदे भाजपमध्ये प्रवेश करणार होता.





यानंतर सोशल मीडियावरुन भाजपवर टीकेचा भडिमार झाला. अखेर भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी कार्यक्रमाकडे पाठ फिरवली. आचारसंहिता जाहीर झाल्याचं कारण देण्यात आलं. भाजपच्या स्थानिक नेत्यांनी शिंदे यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांचा पक्षप्रवेश गुंडाळत कार्यक्रमातून काढता पाय घेतला. पण आज हा पक्ष प्रवेश झाला आहे.राज्याचे गृहमंत्रीपद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे असतानाच आगामी ठाणे महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ठाण्यात गुंड मयूर शिंदेचा पक्षप्रवेश होऊ घातल्यानं भाजपच्या साधनशुचितेचं काय झालं, अशी चर्चा जोर धरु लागली. स्थानिक पातळीवरील कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांना गुंडाला पक्ष प्रवेश देण्याचा फारसा पटलेला नव्हता. शिंदे याच्यावर खून, खुनाचा प्रयत्न, खंडणी, अपहरण, दंगल माजवणं व पोलिसांना मारहाणीचा प्रयत्न अशा गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल होते. २०११ साली पोलिसांनी त्याच्यावर मोक्काअंतर्गत कारवाई केली होती. तसेच त्याच्यावर तडीपारीचीही कारवाई केली होती.गंभीर गुन्ह्यात जामिनावर असलेल्या शिंदे याला प्रवेश देण्यासाठी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण हजेरी लावणार असल्याचे बॅनर शहरात झळकले होते. रविवारी यासंदर्भात 'मटा'मध्ये वृत्त प्रसिध्द होताच वरिष्ठ पातळीवर तात्काळ सुत्रं फिरली. सोमवारी जाहीर झालेल्या महापालिका निवडणुकांच्या आचारसंहितेचं कारण देत हा पक्षप्रवेश तूर्तास होत नसल्याचे भाजपचे ठाणे जिल्हाध्यक्ष संदीप लेले यांनी सांगितलं होतं. तसेच प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण पनवेल येथे नियोजित कार्यक्रमाला गेल्यानं ठाण्यात पक्ष प्रवेशाला हजर राहू शकले नाहीत, अशी माहिती लेले यांनी दिली.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# खळबळजनक! हॉटेलच्या नावाखाली मानवी तस्करी

## अल्पवयीन बांगलादेशी मुलीसह महिला... पोलिसांनी मालकासह तिघांच्या आवळल्या मुसक्या

**नवी मुंबई :** अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष आणि गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सोमवारी, २१ डिसेंबर २०२५ रोजी रात्री 'हॉटेल नवनाथ इन लॉजिंग' येथे मोठी कारवाई करून बेकायदेशीर वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश केला. या छाप्यात एका १६ वर्षीय अल्पवयीन बांगलादेशी मुलीसह अनेक भारतीय आणि बांगलादेशी महिलांची सुटका करण्यात आली आहे. या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून मानवी तस्करीचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस शिपाई विवेक देविदास पारासुर यांच्या पथकाने हे ऑपरेशन राबवले.




हॉटेलमध्ये वेश्याव्यवसाय सुरू असल्याची खात्री करण्यासाठी पोलिसांनी एका बनावट ग्राहकाचा (नितीन बावसकर) आधार घेतला. सरकारी सिक्रेट फंडातून मिळालेल्या २,००० रुपयांच्या नोटांसह बनावट ग्राहकाला लॉजमध्ये पाठवण्यात आले. व्यवहाराची पुष्टी होताच, पंचांच्या उपस्थितीत पोलिसांनी हॉटेलवर धाड टाकली.तपास पथकाने हॉटेलच्या पहिल्या माळ्यावरील रूम नंबर २०१ मध्ये प्रवेश केला असता, तेथे २६ आणि ३९ वर्षीय बांगलादेशी महिलांसह एकूण पाच महिला आढळल्या. पोलिसांनी घटनास्थळावरून गर्भनिरोधक साधने, रोकड, एसी, टीव्ही आणि इतर साहित्य जप्त केले. त्यानंतर दुसऱ्या माळ्यावरील रूम नंबर ३०१ ते ३०५ ची झडती घेतली असता, तेथे आणखी सहा महिला आढळल्या. यामध्ये एका १६ वर्षांच्या अल्पवयीन बांगलादेशी मुलीचा समावेश होता, जिचा वेश्याव्यवसायासाठी बळी दिला जात होता.या प्रकरणी हॉटेलचा मॅनेजर गिरीश विठ्ठल शेट्टी, मालक वसंत गणेश शेट्टी आणि सर्व्हिस बॉय रोशन रामजित यादव यांच्याविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिसांनी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ (कलम १४३, ३), अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा १९५६ आणि विशेषतः पोक्सो (झजउडज) कायद्यांतर्गत कठोर कलमे लावली आहेत.

सुरक्षेचे आवाहन लॉजचे सीसीटीव्ही फुटेज, रजिस्टर आणि इतर कागदपत्रे पोलिसांनी ताब्यात घेतली आहेत. महिला आणि अल्पवयीन मुलींच्या शोषणाविरुद्ध हे मोठे पाऊल असल्याचे पोलीस प्रशासनाने म्हटले आहे. तसेच, नागरिकांनी अशा बेकायदेशीर कृत्यांबाबत सतर्क राहून पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन केले आहे.

# लग्नापासून एकाही रात्री नवरा खोलीत आला नाही, तो कधीही..

**लखनौ :** एका महिलेने तिच्या डॉक्टर पतीवर गंभीर आरोप केले आहेत. ती म्हणते की तो नपुंसक आहे आणि लैंगिक संबंध ठेवू शकत नाही. गेल्या दीड वर्षांपासून त्यांनी शारिरीक संबंध ठेवलेले नाहीत. तो काही ना काही कारण सांगत दुसऱ्या खोलीत निघून जातो. तिने तिच्या डॉक्टर पतीविरुद्ध पोलिस ठाण्यात एफआयआर दाखल केली आहे. महिलेच्या म्हणण्यानुसार, तिचे लग्न २५ एप्रिल २०२४ रोजी झाले होते. लग्न झाल्यापासून तिचा पती विचित्र वागत होता. तो वेगवेगळी कारणं सांगून रोज रात्री दुसऱ्या खोलीत झोपायला जातो.उत्तर प्रदेशातील गोरखपूर जिल्ह्यातील महिलेचा दावा आहे की, तिच्या वडिलांनी या डॉक्टरसोबत तिचं लग्न लावून दिलं होतं. त्याला १५ लाख रुपये आणि मौल्यवान वस्तू हुंडा म्हणून दिल्या. तिचा आरोप आहे की तिच्या सासरच्या लोकांनी तिच्याकडे गाडीची मागणी करत आहेत. जेव्हा तिने तिच्या डॉक्टर नवऱ्याच्या अशा वागण्याबाबत घरी सांगितलं, तेव्हा सासरच्यांनी तिला मारहाण केली आणि घराबाहेर हाकलून लावले. तिच्या भावाच्या तक्रारीवरून, गोला पोलिस ठाण्यात तिच्या पती आणि इतर चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे.महिलेचा पती गोरखपूरच्या खजनी भागात पशुवैद्यकीय डॉक्टर आहे. गोला पोलीस स्टेशन परिसरातील रहिवासी असलेल्या महिलेच्या भावाने गोला पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केली आहे की, त्याच्या बहिणीचे लग्न २५ एप्रिल २०२४ रोजी खजनी परिसरातील एका तरुणाशी झाले होते. तो खजनी परिसरात पशुवैद्यकीय डॉक्टर आहे. त्याने १५ लाख रुपयांचा हुंडा घेतलेला.असा आरोप आहे की, इतका हुंडा दिल्यानंतरही तिचे सासरचे लोक संतुष्ट नव्हते. त्यांचा मुलगा डॉक्टर आहे आणि त्याला किमान गाडी तरी मिळायला हवी होती असा त्यांचा आग्रह होता. त्यांनी वारंवार आग्रह धरला, परंतु तिने तिच्या पतीबद्दल जे सांगितले ते ऐकून त्यांना धक्काच बसला.

# बॉयफ्रेंड वडिलांना संपवत होता, लेक खिडकीत उभं राहूनच सारं पाहत होती


**गांधीनगर :** पोटची पोरं किती निर्दयी आणि स्वार्थी असू शकतात हे या घटनेवरुन दिसून येते, जिथे एका मुलीने आपल्याच वडिलांच्या हत्येचा कट रचला. त्या वडिलांचा ज्यांचा बोट पकडून तिने पहिलं पाऊल टाकलं असेल. गुजरातमधील वडोदरा जिल्ह्यातून ही धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेने सर्वांनाच धक्का बसला आहे. पद्रा तहसीलमधील एका गावातील रहिवासी रावजी चावडाची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. पोलिस तपासात असे दिसून आले आहे की, ही हत्या मृत रावजीच्या अल्पवयीन मुलीने तिच्या प्रियकरासह मिळून केली होती.पोलिसांनी याप्रकरणी दिलेल्या अधिक माहितीनुसार, वडोदरा जिल्ह्यात राहणाऱ्या रावजी चावडाची चाकूने वार करून हत्या करण्यात आली होती. घटनेच्या रात्री अल्पवयीन मुलीने तिच्या वडिलांच्या जेवणात झोपेच्या गोळ्या मिसळल्या होत्या. वडील गाढ झोपेत असताना तिचा प्रियकर रणजीत वाघेला पहाटे अडीच वाजता त्याच्या मित्र भव्य वसावासोबत घरात घुसला. दोघांनी चावडावर झोपेत असताना तीन वेळा वार केले आणि पळून गेले. दरम्यान, मुलगी खिडकीजवळ उभी राहून तिचा प्लॅन यशस्वी होतो का हे पाहत होतीतपासात असेही दिसून आले की, त्यांचा हा पहिलाच प्रयत्न नव्हता. मुलीने यापूर्वी दोनदा तिच्या पालकांना पाण्यातून आणि जेवणातून झोपेच्या गोळ्या दिल्या होत्या. परंतु हत्येचा कट अयशस्वी झाला नव्हता. आरोपी तिसऱ्यांदा त्यांच्या योजनेत यशस्वी झाले.वडिलांना त्यांच्या




मुलीचे प्रेमसंबंध मान्य नव्हते. काही महिन्यांपूर्वी वडिलांनी रणजीत वाघेलाविरुद्ध पॉक्सो कायद्याअंतर्गत तक्रारही दाखल केली होती. त्यानंतर रणजीतला तुरुंगात टाकण्यात आले. जामिनावर सुटल्यानंतर त्याने पुन्हा अल्पवयीन प्रेयसीसोबत मिळून हत्येचा कट रचला. ही अल्पवयीन मुलगी आपल्या प्रियकरासोबत पळून जाण्याच्या प्रयत्नात होती. वडिलांनाही याची भिती होती. त्यामुळे ते रात्री पत्नी आणि मुलीला एका खोलीत बंद करत आणि कुलूप लावून चाव्या आपल्याकडे ठेवत. यामुळे तिला पळून जाता येत नव्हते. त्यामुळे तिने थेट आपल्या वडिलांच्या हत्येचा कट रचला.

# मित्रांसोबत काय करतेयस? सोसायटीतील काकांनी धारेवर धरलं, २२ वर्षीय तरुणीने धडा शिकवला, आता ६२ लाखांची नोटीस..

**बंगळुरु :** २२ वर्षीय तरुणीने तिच्या घरी मित्रांसोबत छोटेखानी कार्यक्रम आयोजित केला होता. मात्र या दरम्यान सोसायटीतील कमिटी सदस्यांनी दिलेल्या त्रासाला कंटाळून तिने तब्बल ६२ लाख रुपयांचा दिवाणी दावा दाखल केला आहे. तरुणीने धाडसी पाऊल उचलल्याने सोशल मीडियावर तिचे कौतुक होत आहे.ही घटना बंगळुरूमधील एका सोसायटीत घडली. तरुणीच्या घरी पाच मित्र आले होते. तरुणीने स्पष्ट केले की, घरी कोणतीही पार्टी किंवा मोठा आवाज नव्हता, ते फक्त जेवण बनवत आणि गप्पा मारत होते.एक काका आले आणि म्हणाले 'येथे अविवाहित लोकांना परवानगी नाही, ज्यांच्याकडून तुम्ही फ्लॅट भाड्याने घेतला आहे त्यांना बोलवा.' मी त्यांना सांगितले की मीच मालक आहे आणि तुम्हाला यात नाक खुपसण्याची गरज नाही. मी दरवाजा बंद केला. यामुळे त्यांचा अहंकार दुखावला गेला' असे तरुणीने म्हटले आहे.त्यानंतर, चार ते पाच जण तिच्या परवानगीशिवाय लिव्हिंग रूममध्ये घुसले आणि तिच्या मित्रांवर मद्यपान आणि गांजा ओढण्याचा आरोप करु लागले. तसेच तिला दुसऱ्याच दिवशी फ्लॅट रिकामा करण्यास सांगितले. तिच्या पुरुष मित्रांनी हस्तक्षेप करून त्या लोकांना बाहेर काढले. या झटापटीत, 'माझ्या फ्लॅटची तपासणी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका व्यक्तीला थप्पड मिळाली, कारण तो अतिक्रमण करत होता,' असे तरुणीने सांगितले.त्यानंतर सोसायटीच्या सदस्यांनी पोलिसांना बोलावले. पोलिसांनी फ्लॅट कोणाच्या मालकीचा आहे असे



विचारले असता, तरुणीने तिचे नाव सांगितले. कागदपत्रे दाखवण्यास सांगण्यात आले, परंतु तरुणीने नकार दिला कारण तिचे मित्र कोणताही गोंधळ करत नव्हते. सोसायटीतील इतर सदस्यांना तिच्या घरात प्रवेश करण्याचा अधिकार नव्हता. तरुणीने सांगितले की, ती एकटी राहते आणि तिच्या वडिलांनी सुरक्षेसाठी लिव्हिंग रूममध्ये कॅमेरा बसवला होता, ज्यामध्ये सर्व घटना रेकॉर्ड झाली होती.

पुढील पोस्टमध्ये, तरुणीने सोसायटी आणि वैयक्तिक सदस्यांविरुद्ध अतिक्रमण, छळ आणि मारहाण केल्याबद्दल कायदेशीर नोटीस पाठवल्याचे उघड केले. तिने बिल्डर आणि सोसायटीच्या अध्यक्षांना सीसीटीव्ही फुटेज दाखवले, त्यानंतर आरोपी सदस्यांना त्वरित कमिटीवरुन हटवण्यात आले आणि प्रत्येकी २०,००० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला.

आम्ही ६२ लाखांची नुकसान भरपाई मागितली आहे. माझे वकील म्हणाले की भारतात पूर्ण रक्कम मिळणे जवळजवळ अशक्य आहे, परंतु १०-१२ टक्के जरी मिळाले तरी ते पुरेसे असेल. आम्ही त्यांच्याकडून पुन्हा कधीही संपर्क न साधण्यासाठी कायमस्वरूपी मनाई हुकूम देखील दाखल केला आहे.'



# स्मृती मानधनाचा षटकार होता की आगीचा गोळा, चेंडू कुठे गेला हे कळलंच नाही

**विशाखापट्टणम :** भारताने दुसऱ्या टी २० सामन्यात श्रीलंकेवर दणदणीत विजय साकारला. शेफाली वर्माने या सामन्यात दमदार अर्धशतक झळकावले आणि भारताचा विजय तिने सुकर केला. पण शेफालीच्या खेळीपेक्षा सर्वात जास्त चर्चा सुरु झाली आहे ती स्मृती मानधनाच्या षटकाराची. कारण स्मृतीने यावेळी असा दमदार षटकार खेचला की, त्याला तोडच नव्हती. यावेळी हा चेंडू बॅटवर आल्यावर नेमका कुठे गेला हे समजलेच नाही. स्मृतीच्या या षटकाराचा व्हिडिओ जोरदार व्हायरल झाला आहे.ही गोष्ट घडली ती तिसऱ्या षटकात. त्यावेळी श्रीलंकेची मल्की मदारा यावेळी गोलंदाजी करत होती. या षटकाच्या चौथ्या चेंडूवर ही गोष्ट पाहायला मिळाली. स्मृती मानधना यावेळी फलंदाजी करत होता. स्मृती मानधनाने या चेंडूवर फटका मारला पण त्यावर धाव आली नाही. पण हा चेंडू नो बॉल असल्याचे समोर आले. त्यामुळे स्मृती म ानधनाला फ्री हिट मिळाली होती. आता गोलंदाज मल्की कशी गोलंदाजी करते, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले होते. पण मल्कीने यावेळी वाईड चेंडू टाकला. त्यामुळे पुन्हा फ्री हिट कायम होता. त्यानंतर पुन्हा मल्की गोलंदाजीला आली आणि तिने पुन्हा एकदा वाईड चेंडू टाकला. मल्की यावेळी स्मृतीला घाबरली की काय, अशी चर्चा सुरु झाली होती. पण त्यानंर मल्कीने योग्य चेंडू टाकला जो स्मृतीच्या बॅटवर आला.स्मृती यावेळी मोठा फटका मारण्यासाठी सज्ज असल्याचे पाहायला मिळाले. मल्कीने टाकलेला बॉल जसा पीचवर पडला तशी स्मृती ही पुढे झाली आणि तिने हा चेंडू योग्यपणे बॅटवर घेतला. पण सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे स्मृतीचे या चेंडूवर टायमिंग एवढे अप्रतिम होते की, हा चेंडू स्मृतीच्या बॅटवर आला खरा, पण त्यानंतर हा चेंडू हवेत कुठे गायब झाला हे काही काळ समजले नाही.स्मृतीने मारलेला हा चेंडू जेव्हा सीमारेषेच्या पार गेला, तेव्हा सर्वांना चेंडू दिसला. त्यावेळी पंचांनी हा षटकार असल्याचे जाहीर केले आणि त्यानंतर तिच्या या फटक्याचा व्हिडिओ जोरदार व्हायरल झाला आहे.स्मृतीला या सामन्यात जास्त धावा करता आल्या नाहीत, पण स्मृतीचा हा षटकार मात्र सर्वांच्या लक्षात नक्कीच राहील.

# सूर्याचा गेम करायला गिलनंतर कोणाला बनवणार गौतम गंभीर मोहरा..

**नवी दिल्ली :** रोहित शर्मानंतर सूर्यकुमार यादवचा गेम करण्याचं गौतम गंभीर यांनी ठरवल्याचं म्हटलं जात होतं. ही गोष्ट सर्वांनाही जाणवली. कारण रोहित शर्माला कर्णधारपदावरून काढण्यासाठी गौतम गंभीर यांनी शुभमन गिलचा वापर केला. यामध्ये गौतम गंभीर यशस्वी झाले. त्यानंतर गौतम गंभीर यांनी आपला मोर्चा वळवला सूर्यकुमार यादवकडे वळवला. पुन्हा एकदा त्यांनी शुभमन गिलची चाल खेळली. पण ते यामध्ये अपयशी ठरले. कारण सूर्याने एकही टी २० मालिका गमावली नाही आणि तो सतत यश मिळवत राहीला. पण शुभमन गिलला टी २० संघाचा कर्णधार बनवता आलं नाही, त्यामुळे आता गौतम गंभीर यांनी एक वेगळा मोहरा बाहेर काढला असल्याचे म्हटले जात आहे.गौतम गंभीर यांनी सुरुवातीला रोहित शर्माकडून कसोटी संघाचे कर्णधारपद काढून घेतले. त्यावेळी शुभमन गिलला त्यांनी नेतृत्व दिले. रोहित शर्माने भारताला चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकवून दिली होती. पण तरीही रोहित शर्माला वनडे संघाच्या कर्णधारपदावरून गौतम गंभीर यांनी काढले. पुन्हा एकदा गौतम गंभीर यांनी शुभमन गिल नावाचा मोहरा पुढे केला. रोहित शर्माकडून कसोटी आणि वनडे अशा दोन्ही संघांचे कर्णधारपद त्यांनी काढून घेतले होते. आता फक्त टी २० संघाचा कर्णधार करणे शुभमन गिलला बाकी होती. त्यासाठीही गौतम गंभीर यांनी वेगळी चाल खेळली. आशिया कप स्पर्धेतच्या संघात गौतम गंभीर यांनी शुभमन गिलला फक्त संधी दिली नाही तर त्यांनी त्याला उप कर्णधारही बनवले. त्यामुळे सूर्यकुमार यादवर अंकुश ठेवण्याचं काम गौतम गंभीर यांनी चोख बजावलं. पण गिलला टी २० क्रिकेटमध्ये चांगली कामगिरी करता आली नाही आणि त्यामुळे त्याला टी २० वर्ल्ड कपच्या संघामधून वगळण्यात आलं. आता गिलला टी २० संघाचा कर्णधार करताच येणार नाही, हे सर्वांना कळूच चुकलं आहे. त्यामुळे आता सूर्यकुम ार यादवने एक नवा मोहरा शोधून काढला आहे.सूर्यकुमार यादवला टी २० वर्ल्ड कपनंतर भारताच्या कर्णधारपदावरून काढण्यात येणार आहे. गौतम गंभीर यांनी ही गोष्ट आधीच ठरवली आहे. सूर्याच्या जागी आता गौतम गंभीर संजू सॅमसनला कर्णधार बनवण्याचा विचार करत असल्याचे सूत्रांनी सांगितले आहे. त्यामुळे आता सूर्या जास्त काळ टी २० संघाचा कर्णधार राहणार नसल्याचे समोर येत आहे.गौतम गंभीर यांनी शुभमन गिलचा वापर करून पाहिला, पण त्यामध्ये ते अपयशी ठरले. आता कोणता खेळाडू त्यांना टी २० संघाचा कर्णधार म्हणून हवा आहे, हे आता समोर आलं आहे.



# स्मृतीला बसला मोठा धक्का

**नवी दिल्ली :** स्मृती मानधनाचं काही दिवसांपूर्वी लग्न मोडलं होतं. पण तरीही तिनेहार मानली नाही. स्मृतीने क्रिकेटच्या मैदानात दमदार कमबॅक केलं. श्रीलंकविरुद्धच्या पहिल्या टी २० सामन्यात तिने धडाकेबाज फटकेबाजी करत चार चौकार लगावले आणि संघाला चांगली सुरुवात करून दिली. पण आता दुसरा टी २० सामना सुरु होण्यापूर्वी मात्र स्मृतीला एक मोठा धक्का बसला आहे.स्मृती आपल्या खासगी आयुष्यात काही दिवसांपूर्वी वाईट परिस्थितीमधून जात होती. पण या चॅम्पियनने हार मानली नाही. स्मृती पुन्हा मैदानात परतणार की नाही, अशी चर्चाही सुरु झाली होती. पण स्मृतीने या सर्व चर्चांना पूर्णविमार दिला स्मृतीने जे कमबॅक केलं, ते सर्वांना पाहण्यासारखं होतं. कारण स्मृती ही पूर्वीसारखीच मैदानात खएळताना दिसत होती. स्मृतीने २५ धावा करत संघाला चांगली सुरुवात करून दिली आणि त्यामुळेच भारताला पहिला टी २० सामना जिंकता आला होता. आज, मंगळवारी भारताचा दिसरा टी २० सामना होणार आहे. पण या सामन्यापूर्वी आता स्मृतीला मोठा धक्का बसला आहे.स्मृतीने वर्ल्ड कप चांगलाच गाजवला होता. या गोष्टीचे फळही तिला मिळाले होते. स्मृती ही आयसीसीच्या वनडे क्रिकेटच्या



फलंदाजीच्या क्रमवारीत अव्वल स्थानावर विराजमान झाली होती. गेले बरेच दिवस स्मृती ही क्रमवारीत आपले अव्वल स्थान कायम राखून होती. पण स्मृतीला आता या क्रमवारीत मोठा धक्का बसला आहे. कारण स्मृतीच्या खात्यात ११८ गुण आहेत, पण दक्षिण आफ्रिकेच्या लॉरा वोल्वार्डटने यावेळी १२० गुण कमावले आहे. स्मृतीपेक्षा लॉराने दोन गुणांची जास्त कमाई केली आहे. त्यामुळे या क्रमवारीत स्मृतीला लॉराने धक्का दिला आहे. कारण स्मृतीला या क्रमवारीतील आपले अव्वल स्थान गमवावे लागले आहे. या क्रमवारीत लॉरा आता अव्वल स्थानावर विराजमान झाली आहे, तर स्मृतीची यावेळी ११८ गुणांसह दुसऱ्या स्थानावर घसरण झाली आहे.भारत सध्या टी२० क्रिकेट खेळत आहे.

# अमोल मुझुमदार सरांची ती गोष्ट ठरली टर्निंग पॉइंट

**विशाखापट्टणम :** अमोल मुझुमदार यांचं मार्गदर्शन किती मोलंच असतं, याचा प्रत्यय पुन्हा एकदा भारताच्या विजयानंतर आला. भारताने दुसऱ्या सामन्यात श्रीलंकेवर दणदणीत विजय साकारला. भारताच्या या विजयाची शिल्पकार ठरली ती शेफाली वर्माने. शेफालीने या सामन्यात धमाकेदार अर्धशतक झळकावले आणि संघाच्या विजयात सिंहाचा वाटा शेफालीचा होता. त्यामुळे शेफाली वर्माला सामन्यातील सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार देण्यात आला. सामना संपल्यावर संघाचे प्रशिक्षक असलेल्या अमोल मुझुमदार यांनी सांगितलेली गोष्ट टर्निंग पॉइंट ठरली, हे शेफालीने सांगितले आहे.शेफाली वर्माने हा सामना चांगलाच गाजवला. गेल्या सामन्यात ती लवकर बाद झाली होती. पण या सामन्यात मात्र तिने ही सर्व कसर भरून काढली. शेफालीने या सामन्यात फक्त ३४ चेंडूंत तब्बल ११ चौकार आणि एका षटकाराच्या जोरावर नाबाद ६९ धावांची खेळी साकारली. पण ही खेळी साकारल्यावर शेफान अमोल म ुझुमदार यांनी दिलेला सल्ला विसरली नव्हती. सामना संपला आणि शेफाली वर्माने अमोल मुझुमदार यांनी नेमकं काय सांगितलं, याची आठवण सर्वांना सांगितली.शेफाली सामना संपल्यावर म्हणाली की, ‘ सुरुवातीपासून चेंडू चांगला बॅटवर येत होता. त्याम ुळे मी मैदानात मोठे फटके मारायला सुरुवात केली तरी, मी हवेतमधून जास्त



फटके मारले नाही. जमिनीलगत फटके खेळण्यावर माझा भर होता. सुरुवातीला मी जेव्हा फलंदाजीला यायचे, तेव्हा मी आक्रमक फटकेबाजी करून लवकर बाद व्हायचे. पण आक्रमक फटकेबाजी करूनही अखेरपर्यंत उभं राहून सामना कसा संघाला जिंकवून देता येऊ शकतो, हे मला अमोल सरांनी सांगितलं होतं. अमोल सरांच्या या गोष्टीचा मला चांगलाच फायदा झाला आणि तो माझ्यासाठी टर्निंग पॉइंट ठरला आहे. मी क्रिकेटमधून बरचं काही शिकत आहे. अनुभव हा माझा गुरु आहे. कारण अनुभवामुळे माझ्या फलंदाजीत मोठा फरक पडला आहे. दिवसेंदिवस माझ्या खेळात बदल होत आहे, माझा फिटनेसही वाढला आहे. त्यामुळे यापुढेही भारताला सामना कसा जिंकवून देता येऊ शकतो, याचा विचार डोक्याक कायम असेल. शेफाली शर्माने अमोल मुझुमदार यांचा सल्ला एकत एक महत्वाची गोष्ट यावेळी केल्याचे पाहायला मिळाले.


# सेम टू सेम! अक्षय खन्नाच्या गाण्यावर थिरकली शिल्पा शेट्टी; हुक स्टेप्सनं वेधलं लक्ष

**मुंबई :** आजकाल सर्वत्र फक्त 'धुरंधर' आणि अक्षय खन्नाची चर्चा पाहायला मिळत आहे. अक्षय खन्नाची Fa9la गाण्यातील हुक स्टेप सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. प्रत्येकजण यावर व्हिडीओ बनवत आहे. तसेच अक्षय खन्नाच्या भन्नाट स्टाइलचे कौतुक होत आहे. अक्षय खन्नाने 'धुरंधर' ला चारचाँद लावले आहेत.

'धुरंधर' चित्रपट ५ डिसेंबर २०२५ ला थिएटरमध्ये रिलीज झाला. 'धुरंधर' आदित्य धर दिग्दर्शित चित्रपट आहे. कंधार अपहरण आणि २६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यांसह अनेक सत्य घटनांपासून चित्रपट प्रेरित आहे. 'धुरंधर' चित्रपटात रणवीर सिंहसोबत संजय दत्त, अर्जुन रामपाल, सारा अर्जुन, अक्षय खन्ना, आर माधवन, राकेश बेदी हे तगडे कलाकार झळकले आहेत. मीडिया रिपोर्टनुसार, 'धुरंधर' चित्रपटाचे बजेट २५० कोटींच्या अधिक आहे. 'धुरंधर' हा ॲक्शन चित्रपट आहे.

बॉलिवूड अभिनेत्री शिल्पा शेट्टीने 'धुरंधर' मधील अक्षय खन्नाच्या ऋर९श्रर गाण्यावर भन्नाट डान्स केला आहे. गाण्यातील अक्षय खन्नाची व्हायरल स्टेप करताना शिल्पा दिसत आहे. तिच्या चेहऱ्यावरचे हावभाव खूप भन्नाट दिसत आहे. गाण्याचा पूर्ण आनंद घेताना दिसत आहे. तिने डान्स व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर करून त्याला हटके कॅप्शन दिलं आहे. तिने लिहिलं की, 'फॅन तो मिला नहीं लेकीन मै फॅन हो गई हू, तो ये ट्रेंड करना बनता था...' तसेच तिने 'धुरंधर' मधील कलाकारांचे कौतुक देखील केले आहे.






शिल्पा शेट्टीने शेअर केलेल्या व्हिडीओवर चाहते आणि कलाकारांकडून कमेंट्सचा वर्षाव होत आहे. 'धुरंधर' ने बॉलिवूडला देखील वेड लावले आहे. रिपोर्टनुसार, 'धुरंधर'ने आतापर्यंत ५५० कोटींचा टप्पा ओलांडला आहे. 'धुरंधर' चित्रपटातील डायलॉग , गाणी सर्वच काही प्रेक्षकांना प्रचंड आवडत आहे.

# बॉलिवूडचा खिलाडी टिव्हीवर येणार; दमदार होस्टिंगने शो गाजवणार

**मुंबई :** बॉलिवूडचा खिलाडी टीव्हीवर येत आहे. त्याच्या नवीन शोची नुकतीच घोषणा झाली आहे. अक्षय कुमारला आता रोज पाहायला मिळणार आहे. त्यामुळे चाहते खूपच खुश आहे. अलिकडेच अक्षय कुमार 'जॉली एलएलबी ३' मधून प्रेक्षकांच्या भेटीला आला. त्यानंतर तो अनेक शोमध्ये दिसला. मात्र आता अक्षय कुमार (अज्ञीहू धींरी) एक नवीन शो घेऊन येत आहे. या धमाकेदार शो चा प्रोमो प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे.

अक्षय कुमारच्या नवीन शोचे नाव 'व्हील ऑफ फॉर्च्युन' (थहशशश्र जष त्रॅीपिश) असे आहे. या शोचे होस्टिंग अक्षय कुमार करणार आहे. त्यामुळे शोची क्रेझ चाहत्यांमध्ये पाहायला मिळत आहे. या शोमधून सर्वसामान्यांना आपले नशीब पालटण्याची संधी मिळणार आहे. हा टीव्ही शो तब्बल ४० देशांमध्ये प्रसिद्ध आहे. हा शो सोनी एंटरटेनमेंट टेलिव्हिजन आणि सोनी लिव्हवर पाहायला मिळणार आहे. 'व्हील ऑफ फॉर्च्युन' च्या प्रोमोने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. बंगल्यातला नोकर कसा मालक बनतो आणि मालक नोकर हे प्रोमोत पाहायला मिळते. व्हिडीओत दिसते की, अक्षय कुमार एका मोठ्या घरात नोकर असतो. ज्याचे नाव रामू असते. त्या घरातील मालकाचा मृत्यू होतो. तेव्हा वकील मृत्यूपत्राचे वाचन करतात. तेव्हा वडील आपली कोट्यवधींची संपत्ती मुलगा रामच्या नावावर न करता नोकर रामूच्या नावावर केल्याचं दिसते. हे पाहून सर्वांना धक्का बसतो. खरंतर मृत्यूपत्रात 'राम' नाव लिहिलेले असते मात्र अक्षय कुमार खूप हुशाहीने रामाचे 'रामू' करतो आणि नोकरचा मालक बनतो.



'व्हील ऑफ फॉर्च्युन' हा अमेरिकेतील हा सगळ्यात प्रसिद्ध टीव्ही शो आहे. या शोला ८ एमी अवॉर्ड्स मिळाले आहेत. प्रोमोच्या शेवटी अक्षय कुमार 'तीस मार खान'च्या लूकमध्ये दिसतो आणि म्हणतो की, 'एका ऊकारामुळे सगळं बदललं. शब्दांची जादू आहे, त्यामुळे जादूचे चक्र फिरल्यावर एक एक अक्षर महत्त्वाचे आहे. ' शोची रिलीज डेट अद्याप जाहीर झाली नाही.

# १६ वर्षांचा संसार मोडला, घटस्फोटानंतर शेअर केली पोस्ट

**मुंबई :** अभिनेत्री मॉडेल हिने लग्नाच्या १६ वर्षांनंतर घटस्फोट घेतला आहे. सोशल मीडियावर पोस्ट करून तिने ही बातमी आपल्या चाहत्यांना दिली आहे. ही अभिनेत्री म्हणजे श्रीनंदा शंकर. श्रीनंदा सोशल मीडियावर खूप सक्रिय असते. ती एक इन्फ्लुएन्सर देखील आहे. श्रीनंदा शंकरच्या नवऱ्याचे नाव गेव सत्तारवाला (ऋर्शी डरींरिुरश्रर) असे आहे. श्रीनंदा आणि गेवने लग्नाच्या १६ वर्षांनी घटस्फोट घेतला आहे.

अभिनेत्री श्रीनंदाने सोशल मीडियावर एक भावुक पोस्ट शेअर केली आहे. 'गेव आणि मी अधिकृतपणे वेगळे झालो आहोत...' असे म्हणत तिने आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. घटस्फोटानंतर आम्ही चांगले आणि शांत आयुष्य जगत असल्याचे तिने सांगितले. तसेच त्यांच्या गोपनीयतेचा आदर ठेवण्याची विनंती तिने केली आहे. त्यानंतर श्रीनंदाने एक व्हिडीओ देखील पोस्ट केला आहे. श्रीनंदाच्या पोस्टवर नेटकरी कमेंट्स करताना दिसत आहे. तसेच तिला पाठिंबा देत आहेत. गेव आणि श्रीनंदा यांचे लव्ह मॅरेज होते. दोघे पहिल्यांदा सोशल मीडियावर भेटले. ८ महिने दोघे एकमेकांचे चांगले मित्र होते. त्यानंतर मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले. दोघे तब्बल ५ वर्ष लिव्ह-इन-रिलेशनशिपमध्ये राहत होते. २००९ मध्ये गेव आणि श्रीनंदा यांनी लग्नगाठ बांधली. त्यानंतर दोघांनी आता २०२५ मध्ये म्हणजे तब्बल १६ वर्षांनी आपले नाते संपवले.





# 'प्रत्येकाचं सत्य वेगळं, डाव अजून संपलेला नाही'; 'दृश्यम ३' ची रिलीज डेट जाहीर



**पुणे :** बॉलिवूडचा सिंघम अजय देवगणचा बहुप्रतिक्षित चित्रपट 'दृश्यम ३' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. चित्रपटाची रिलीज डेट समोर आली आहे. तसेच नुकताच चित्रपटाची धमाकेदार झलक पाहायला मिळाली आहे. टीझर पाहून चाहते 'दृश्यम ३'साठी खूपच उत्सुक पाहायला मिळत आहेत. 'दृश्यम ३'मधून पुन्हा एकदा विजय साळगावकर प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

'दृश्यम ३'च्या टीझरमध्ये पहिला दोन भागांची झलक पाहायला मिळत आहे. सुरुवातीपासूनची गोष्ट दिसत आहे. व्हिडीओत विजय साळगावकर म्हणते की, 'दुनिया मला अनेक नावांनी ओळखत, पण मला काही फरक पडत नाही. मागच्या सात वर्षात जे काही झाले, मी जे काही केले, जे पाहिले, जे दाखवले यावरून मला एक गोष्ट समजली आहे, जगात प्रत्येकाचे 'सत्य' वेगळे आहे. माझे सत्य फक्त माझे 'कुटुंब' आहे. जोपर्यंत सगळे थकणार नाहीत, जोवर सगळे हार मानणार नाहीत तोपर्यंत मी इथेच उभा आहे. एक रक्षक म्हणून, माझ्या कुटुंबाचा आधार म्हणून...गोष्ट अजून संपलेली नाही...शेवटचा भाग अजून बाकी आहे...'

अजय देवगणच्या 'दृश्यम'चा हा तिसरा भाग आहे. पहिले दोन भाग खूप गाजले. आता तिसरा भाग पुन्हा धुमाकूळ घालायला येत आहे. २०१५ ला 'दृश्यम' आणि २०२२ ला 'दृश्यम २' रिलीज झाला. दोन्ही चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर तगडी कमाई केली.

'दृश्यम ३' च्या ट्रेलरला हटके कॅप्शन देण्यात आले आहे. लिहिलं की, 'आखिरी हिस्सा अभी बाकी है...' अजय देवगणचा 'दृश्यम ३' नवीन वर्षात प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. चित्रपट २ ऑक्टोबर २०२६ रोजी थिएटरमध्ये येणार आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अकोल्यात शनिवारपासून ॲग्रोटेक राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन...

जनसंचलन/बुलढाणा

डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, कृषी विभाग, महाराष्ट्र शासन व आत्मा अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने ॲग्रोटेक या राज्यस्तरीय भव्य कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे तीन दिवसीय कृषी प्रदर्शन दि. २७ ते २९ डिसेंबर २०२५ या कालावधीत डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, कृषीनगर, अकोला येथील क्रीडांगणावर होणार आहे. या प्रदर्शनाचा शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विज्ञान केंद्र, बुलढाणा येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. अमोल झापे यांनी केले आहे. या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनात नवोन्मेषी कृषी तंत्रज्ञानाचे विस्तृत व्यासपीठ शेतकऱ्यांसाठी खुले राहणार आहे. हवामान बदलामुळे निर्माण होत असलेल्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी तसेच शेती शाश्वततेकडे नेण्यासाठी हे प्रदर्शन उपयुक्त ठरणार आहे. तीन दिवस चालणाऱ्या या प्रदर्शनात लाखो शेतकरी सहभागी होण्याची अपेक्षा आहे. या ॲग्रोटेक कृषी प्रदर्शनात कृषी विद्यापीठ व संलग्न कृषी संस्थांची दालने, विद्यापीठ शास्त्रज्ञांसोबत विविध विषयांवर दररोज चर्चासत्र, कृषी अवजारे व उत्पादनांची दालने, कृषी व कृषी संलग्नित योजनांची माहिती, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास विभागाची दालने, मत्स्य व्यवसाय विभागाची दालने, कृषी व ग्रामीण उद्योगांची माहिती, फुले, फळे व भाजीपाला प्रदर्शन, बचत गटांचा सहभाग तसेच विद्यापीठ प्रकाशनांचे दालन यांचा समावेश राहणार आहे. या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून कृषी तंत्रज्ञानाचा जागर होणार असून शेतकऱ्यांनी या पर्वणीचा आवर्जून लाभ घ्यावा. प्रदर्शनातील अत्याधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा आपल्या पंचक्रोशीत प्रसार करून शेती सुजलाम-सुफलाम करण्यासाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी ॲग्रोटेक राज्यस्तरीय भव्य कृषी प्रदर्शनास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. अमोल झापे यांनी केले आहे.

# सहकार विद्या मंदिरमध्ये सांस्कृतिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न...



जनसंचलन/बुलढाणा

स्थानिक बुलडाणा अर्बन चॅरीटेबल संस्थेमध्ये सहकार विद्या मंदिर या सी.बी.एस.ई. मान्यता प्राप्त व सहकार विद्या मंदिर व ज्युनिअर कॉलेजचा सांस्कृतिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम एकत्रीतपणे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. असंख्य नयनरम्य कार्यक्रमाची रेलचेल असलेला हा सोहळा विद्यार्थी वर्ग व अवघ्या महाराष्ट्रातून तसेच शेजारील राज्यातुन आलेल्या पालकांसाठी मोठी पर्वणी होता. या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रलकांनी विविध अविस्मरणीय सांस्कृतिक कार्यक्रमांचा आस्वाद घेतला. शालेय जिवनात स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्याच्या आयुष्यातील सुखद क्षण असतात. सहकार विद्या मंदिर मध्ये विद्यार्थ्यांना हे ऐतिहासिक आनंदाचे क्षण आयुष्यभर सोबत रहावे यासाठी योग्य व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यात येते. दि.२३ डिसेंबर रोजी विद्यार्थ्यांचे सहकार सांस्कृतिक भवनामध्ये हे संमेलन होते.या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणुन बुलढाणा अर्बनचे संस्थापक अध्यक्ष राधेश्यामजी चांडक, तर अध्यक्षस्थानी बुलढाणा अर्बनचे अध्यक्ष डॉ. सुकेशजी झंवर, बुलढाणा अर्बन चॅरिटेबल सोसायटी च्या अध्यक्षा सौ. कोमलजी झंवर, बुलढाणा अर्बनचे उपाध्यक्ष विनोदजी केडीया,गोपालजी चिराणीवा, विधी तज्ञ जितेंद्रजी कोठारी, चार्टड अकाऊंड सचिनजी वैद्य यांची मंचावर विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पुजनाने झाली. याप्रसंगी डॉ. सुकेशजी झंवर यांनी शाळेत सुरु असलेल्या विविध उपक्रमाची माहिती देत निट व आयआयटी चे परीक्षाचे उत्कृष्ट शिक्षण देणारे शैक्षणिक हब सहकार विद्या मंदिरमध्ये निर्माण करण्यात येईल याची ग्वाही उपस्थितांना दिली. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणात सहकार विद्या मंदिर विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी करीत असलेलया प्रयत्नाचे कौतुक केले. तर राधेश्यामजी उर्फ भाईजि चांडक यांनी सहकार विद्या मंदिर विद्यार्थ्यांसाठी सर्वोत्तम सुविधा उपलब्ध करुन देत आहे व भविष्यात पण अजुन नवनविन उपक्रम सुरु करण्यात येतील अशी ग्वाही दिली. यावेळी लोणारच्या नवनिर्वाचीत नगराध्यक्षा सौ. मिराताई मापारी यांचा सत्कार संस्थेच्यावतीने सौ. कोमलजी झंवर तर भुषणजी मापारी यांचा सत्कार डॉ. सुकेशजी झंवर यांच्या हस्ते करण्यात आला. यानंतर हजारोंच्या संख्येने आलेला पालकवर्ग, भव्य रंगमंच, आधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज अशी ध्वनी व्यवस्था, प्रकाश योजना अश्या वेगवेगळ्या वैशिष्ट्यासह कार्यक्रमास सुरुवात झाली. सहकार संस्कृतिक रंगमंचाच्या भव्य व्यासपीठावर विविध नृत्य आविष्कार दाखवित उपस्थितांची मने जिंकली. यावेळी वर्ग नर्सरी, वर्ग २ री, ५ वी व ८ वी च्या विद्यार्थ्यांनी अप्रतिम नृत्य सादर करीत पालकांना मंत्रमुग्ध केले. वेगवेगळे देखावे तसेच समाज प्रबोधनासहीत विविध सामाजिक विषयावर नृत्य सादर करण्यात आले. याप्रसंगी वर्ग ८ वी च्या विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण प्रभुची विविध रुपे दाखवित सादर केलेले नृत्य हे अविस्मरणीय होते. २०० विद्यार्थ्यांचा सहभाग, उत्कृष्ट नियोजन व वेशभूषा यासह सादर करण्यात आलेल्या नृत्याला उपस्थितांनी उभे राहून कौतुक करीत टाळ्यांचा गजर केला. याप्रसंगी वर्ग १० वीच्या विद्यार्थ्यांनी लज्जतदार व खमंग अशा विविध पदार्थाचे स्टॉल लावलेले होते. याप्रसंगी विद्यार्थ्यासोबतच पालकांना देखील त्यांच्या अंगीभुत कला दाखविण्याकरीता व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यात आले होते. सहकार विद्या मंदिरने भव्य रंगमंचावर पालकांनादेखील नृत्य सादर करण्यास आमंत्रित केले होते. पालकाची देखील उत्कृष्ट प्रतिसाद देत सर्वोत्तम नृत्ये सादर केलीत. शाळेने राबविलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या कार्यक्रमाच्या सुत्रसंचालनाची धुरा श्रीमती अंजेला अंकुश, सौ. भाग्यश्री देशपांडे यांच्यासह विद्यार्थ्यांनी सांभाळली. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी बुलडाणा अर्बन अध्यक्षा सौ. कोमल झंवर यांनी मार्गदर्शन केले. तर प्राचार्य, मुख्याध्यापक, प्रशासकिय अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सर्व शिक्षकवृंद व कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले. याप्रसंगी शालेय प्रशासनातर्फे पालकांचे विशेष आभार मानण्यात आले.

# नव्या वर्षात जिल्ह्यात तीन दिवस स्थानिक सुट्टी जाहीर जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचा आदेश जारी

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा जिल्ह्यात सन २०२६ या वर्षासाठी तीन दिवस स्थानिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार, राष्ट्रमाता माँ जिजाऊ साहेब जयंती निमित्त सोमवार दि. १२ जानेवारी २०२६, रक्षाबंधन निमित्त सोमवार दि. २८ ऑगस्ट २०२६ तसेच जेष्ठागौरी पुजन निमित्त गुरुवार दि. १८ सप्टेंबर २०२६ या दिवशी संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यात स्थानिक सुट्टी घोषित करण्यात आली आहे, असे आदेश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी जारी केले आहे. ही सुट्टी संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यासाठी लागू आहे. तथापि, हा आदेश बुलढाणा जिल्ह्यातील दिवणी, फौजदारी न्यायालये व अधिकोष यांना लागू राहणार नाही , असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# योग्यता प्रमाणपत्र तपासणी सहा दिवस बंद राहणार

जनसंचलन/बुलढाणा



उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बुलढाणा येथे योग्यता प्रमाणपत्र तपासणीसाठी वापरण्यात येणाऱ्या रोध चाचणी मार्गाचे नूतनीकरण करण्यात येणार आहे. या कामासाठी २४ ते २९ डिसेंबर पर्यंत हा रोध चाचणी मार्ग बंद राहणार असल्याने वाहनधारकांनी योग्यता प्रमाणपत्र नोंदणीसाठी कार्यालयात वाहने आणू नयेत, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच ज्या वाहनधारकांनी या कालावधीतील तारखांसाठी आधीच अपॉइंटमेंट घेतलेली आहे, त्यांचे योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरणाचे काम १० व ११ जानेवारी २०२६ रोजी करण्यात येणार आहे. या कालावधीत नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बुलढाणा यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# सिकलसेल निर्मूलनासाठी जिल्ह्यात १५ ते ३१ जानेवारीदरम्यान विशेष मोहीम

जनसंचलन/बुलढाणा

सिकलसेल आजाराच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी बुलढाणा जिल्ह्यात दि. १५ ते ३१ जानेवारी २०२५ या कालावधीत विशेष सिकलसेल जनजागृती व तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेच्या माध्यमातून नागरिकांमध्ये सिकलसेल आजाराबाबत व्यापक जनजागृती करण्यात येणार असून वेळेवर तपासणी, निदान व उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. ही विशेष मोहीम जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण आरोग्य यंत्रणा सज्ज झाली असून जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दतात्रय बिराजदार यांचेही या मोहिमेस विशेष सहकार्य लाभत आहे. मोहिमेदरम्यान जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, आरोग्य उपकेंद्रे तसेच शाळा व महाविद्यालयांमध्ये सिकलसेल तपासणी शिबिरे, समुपदेशन व जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. विशेषतः आदिवासी व दुर्गम भागांतील नागरिक, किशोरवयीन मुले-मुली तसेच गरोदर मातांची तपासणी करण्यात येणार आहे. सिकलसेल आजार हा अनुवंशिक स्वरूपाचा असल्याने त्याची वेळेवर तपासणी व योग्य उपचार अत्यंत आवश्यक आहेत. त्यामुळे जिल्हा आरोग्य विभागाने नागरिकांना या विशेष मोहिमेचा लाभ घेऊन सिकलसेल तपासणी करून घेण्याचे आवाहन केले आहे.

# सिकलसेल निर्मूलनासाठी जिल्ह्यात १५ ते ३१ जानेवारीदरम्यान विशेष मोहीम


जनसंचलन/बुलढाणा

सिकलसेल आजाराच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी बुलढाणा जिल्ह्यात दि. १५ ते ३१ जानेवारी २०२५ या कालावधीत विशेष सिकलसेल जनजागृती व तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेच्या माध्यमातून नागरिकांमध्ये सिकलसेल आजाराबाबत व्यापक जनजागृती करण्यात येणार असून वेळेवर तपासणी, निदान व उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. ही विशेष मोहीम जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण आरोग्य यंत्रणा सज्ज झाली असून जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दतात्रय बिराजदार यांचेही या मोहिमेस विशेष सहकार्य लाभत आहे. मोहिमेदरम्यान जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, आरोग्य उपकेंद्रे तसेच शाळा व महाविद्यालयांमध्ये सिकलसेल तपासणी शिबिरे, समुपदेशन व जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. विशेषतः आदिवासी व दुर्गम भागांतील नागरिक, किशोरवयीन मुले-मुली तसेच गरोदर मातांची तपासणी करण्यात येणार आहे. सिकलसेल आजार हा अनुवंशिक स्वरूपाचा असल्याने त्याची वेळेवर तपासणी व योग्य उपचार अत्यंत आवश्यक आहेत. त्यामुळे जिल्हा आरोग्य विभागाने नागरिकांना या विशेष मोहिमेचा लाभ घेऊन सिकलसेल तपासणी करून घेण्याचे आवाहन केले आहे. सिकलसेलमुक्त बुलढाणा जिल्हा घडविण्यासाठी नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# प्रवाशांच्या समस्या व तक्रार निराकरणासाठी प्रवासी राजा व कामगार पालक दिनाचे आयोजन

जनसंचलन/बुलढाणा

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ बुलढाणा विभागाकडून प्रवाशांना भेडसावणाऱ्या दैनंदिन समस्या, तक्रारी व सुचनांचे आगार पातळीवर जलदगतीने निराकरण करण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक आगारात दर महिण्याच्या बुधवारी सकाळी १० ते २ या वेळेत प्रवासी राजा दिन व दुपारी ३ ते ५ या वेळेत -कामगार पालक दिनफ आयोजित करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून प्रवाशी आणि महामंडळाच्या कामगारांनी लाभ घेऊन समस्यांचे निराकरण करावे, असे आवाहन राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक यांनी केले आहे. परिवहन महामंडळाच्या आगारामध्ये सकाळी १० ते दुपारी २ दरम्यान प्रवासी राजा दिन साजरा करण्यात येणार आहे. यावेळेत प्रवासी, प्रवासी संघटना, शाळा-महाविद्यालये त्यांच्या समस्या, तक्रारी, सूचना लेखी स्वरुपात मांडू शकतील. तसेच दुपारी ३ ते सायंकाळी ५ दरम्यान कामगार पालक दिन साजरा करण्यात येणार आहे. संघटना, कर्मचाऱ्यांचे प्रश्न, तक्रारी लेखी स्वरुपात घेऊन तक्रारीचे किंवा समस्यांचे तत्काळ निराकरण करतील. बुलढाणा विभागातील बुलढाणा आगार येथे दि. २४ डिसेंबर रोजी तर चिखली आगार येथे दि. ३१ डिसेंबर, खामगाव आगार येथे दि. ७ जानेवारी , मेहकर आगार येथे दि. १४ जानेवारी , मलकापुर येथे दि. २१ जानेवारी , जळगाव जामोद येथे दि. २८ जानेवारी व शेगांव आगार येथे दि. ४ फेब्रुवारी रोजी प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन कार्यक्रम घेण्यात येणार आहे. जिल्ह्यातील एसटी बर प्रवाशी व कामगारांनी या सेवेचा लाभ घेवून आपल्या समस्यांचे निराकरण करावे, असे आवाहन विभाग नियंत्रक यांनी केले आहे.




# बालकावर अत्याचार; आरोपीस २० वर्षे कारावास खामगाव न्यायालयाचा निकाल

जनसंचलन/ खामगाव

विशेष बाल प्रकरणात दाखल असलेल्या लैंगिक अत्याचाराच्या गंभीर गुन्ह्यात खामगाव येथील जिल्हा व सत्र न्यायालय क्र. १ यांनी आरोपी योगेश संतोष आवारे (रा. टेंभुर्णा) याला दोषी ठरवत २० वर्षांचा सश्रम कारावास व ८० हजार रुपयांचा दंड अशी कठोर शिक्षा सुनावली. हा गुन्हा पोलिस स्टेशन खामगाव अंतर्गत ०४ जून २०२२ रोजी नोंदविण्यात आला होता. आरोपीने घटनेच्या वेळी अवघ्या १० वर्षांच्या अल्पवयीन बालकाशी अनैसर्गिक कृत्य केल्याचा आरोप होता. या प्रकरणात न्यायालयाने आरोपीविरुद्ध दोषारोप निश्चित करून २८ जानेवारी २०२५ पासून साक्ष नोंदविण्यास सुरुवात केली. सरकार पक्षातर्फे एकूण १३ साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. यामध्ये पीडित बालक, त्याची आई, वैद्यकीय अधिकारी, दुकानदार, जप्ती पंचनाम्याचे साक्षीदार तसेच घटनास्थळावरील साक्षीदार यांचा समावेश होता. सर्व साक्षीदारांची साक्ष विश्वासार्ह ठरली. तपासादरम्यान तत्कालीन उपविभागीय पोलिस अधिकारी अभिनव त्यागी व अमोल कोळी यांनी निष्पक्ष व वस्तुनिष्ठ तपास केला. पीडित बालकाच्या जातीचे प्रमाणपत्र संबंधित उपविभागीय अधिकाऱ्यांकडून निर्गमित असल्याचा ठोस पुरावादेखील न्यायालयात सादर करण्यात आला. सश्रम कारावासाची हजारांची रक्कम पीडित बालकास देण्याचे आदेश. आरोपी हा ०८ जून २०२२ पासून बुलढाणा जिल्हा कारागृहात असल्याने, कालावधीचा त्या लाभशिक्षेमध्ये देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. ठोठावण्यात ८० हजार आलेल्या रुपयांच्या दंडापैकी ७५ हजार रुपये पीडित बालकास देण्याचे निर्देश न्यायालयाने दिले. सरकार पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता उदय आपटे यांनी प्रभावीपणे युक्तिवाद केला. खामगाव ग्रामीण पोलिस स्टेशनच्या महिला साहाय्यक पोलिस उपनिरीक्षक चंदा शिंदे व साहाय्यक पोलिस उपनिरीक्षक सुधीर काळे यांनी कोर्ट पैरवीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली

# अपघातात १९ वर्षीय विद्यार्थिनी ठार

जनसंचलन/ खामगाव




ट्रॅक्टर आणि दुचाकी अपघातात १९ वर्षीय विद्यार्थिनीचा मृत्यू झाल्याची घटना २३ डिसेंबर रोजी ११:३० वाजताच्या सुमारास किन्ही महादेव फाट्याजवळ घडली. मृत विद्यार्थिनी ही उमरा अटाळी येथील असल्याचे निष्पन्न झाले आहे. उमरा अटाळी येथील गौरी सुरेश महानकर (१९) ही विद्यार्थिनी मैत्रिणीच्या भावाच्या दुचाकीने अंत्रज येथे परीक्षा देण्यासाठी जात होती. यावेळी किन्ही महादेव फाट्याजवळ चुकीच्या दिशेने येणाऱ्या ट्रॅक्टरने दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात गौरी महानकर ही गंभीर जखमी झाली. अपघातानंतर तिला तातडीने उपचारासाठी खामगाव येथील सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती तिला मृत घोषित केले. दरम्यान, दुचाकीवर गौरी महानकरसह तिची मैत्रीण आणि मैत्रिणीचा भाऊ असे तिघे जण प्रवास करत होते.




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८